ePaper

# नरेंद्र मोदींना बाळासाहेब ठाकरे यांनीच वाचवलं आहे; अरविंद सावंत



| वर्ष - 6 । अंक - 229 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- जातिवाद पसरविणारे राज ठाकरे हे एकमेव नेते
- रिक्षा चालक मालकांचे प्रलंबित प्रश्न सरकारने सोडवावेत !
- 'म्हैसाळ सिंचन योजना दीड वर्षात पूर्ण करणार'

www.mahaenews.com | ।शनिवार।दिनांक 3 डिसेंबर2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अतिरिक्त आयुक्तपदाचा वाद चिघळला!

## जांभळेंची तक्रार अन् झगडे यांना नोटीस



।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पदाचा वाद महाराष्ट्र प्रशासकीय लवाद (मॅट) मध्ये प्रलंबित असतानाच या पदावरील दोन दावेदारांमध्ये चांगलीच जुंपली आहे. विद्यमान अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे यांच्या नियुक्तीला आव्हान देणाऱ्या उपायुक्त स्मिता झगडे या आढावा बैठका आणि महापालिका सभांना गैरहजर राहत असल्याचे कारण पुढे करत आयुक्त शेखर सिंह यांनी त्यांना नोटीस बजाविली आहे. विशेष म्हणजे प्रदिप जांभळे यांच्या तक्रारीनंतर आयुक्तांनी ही नोटीस बजाविल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.**

महापालिकेत उपायुक्त असलेल्या स्मिता झगडे यांची १३ सप्टेंबर २०२२ रोजी राज्य शासनाने अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती केली. पण, आयुक्त शेखर सिंह यांनी नऊ दिवस उलटूनही झगडे यांना रुजू करुन घेतले नाही. त्यानंतर राज्य शासनाने २२ सप्टेंबर रोजी झगडे यांची नियुक्ती रद्द करुन जांभळे यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती केली. दुसऱ्याच दिवशी जांभळे हे महापालिकेत रुजू झाले. पण, झगडे यांनी जांभळे यांच्या नियुक्तीला 'मॅट'मध्येच आव्हान दिले. त्याच्या सुनावण्या सुरु आहेत. या परिस्थितीत आयुक्त सिंह यांनी झगडे यांना २२ नोव्हेंबर २०२२ रोजी नोटीस धाडली.

### काय म्हटले आहे नोटीसीत?

स्थानिक संस्था कर विभागाची आढावा बैठक, स्थायी समिती, महापालिका सभेच्या नियोजित बैठकीस तुम्ही अनुपस्थित राहील्या आहात. स्थानिक संस्था कर विभागाकडील नोंदणीकृत व्यापारी, व्यावसायिक यांची करनिर्धारण प्रकरणांची तपासणी करण्याकामी खासगी लेखापालांची नियुक्ती करण्यात आली आहे. लेखापालांची मुदत संपल्याने मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येवूनही आपल्या स्तरावर प्रलंबित आहे. सनदी लेखापालांकडून छाननी होवून अंतिम कर निर्धारण निर्णयाकरिता प्राप्त झालेल्या एकूण ७ हजार २९६ नस्त्या १२ जानेवारी २०२२ पासून आपल्याकडे प्रलंबित आहेत. तसेच स्थानिक संस्था कर विभागाकडील एकूण १९ व्यावसायिकांचे स्थानिक संस्था कर अनामत परवाना नस्ती (२४.२८ कोटी) आपल्याकडे निर्णयार्थ प्रलंबित आहेत. यामध्ये नामांकीत कंपन्यांचाही समावेश आहे. याबाबतचा अहवाल अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे यांनी ४ नोव्हेंबर २०२२ रोजी सादर केला आहे.

उपायुक्त म्हणून आपण आपली कर्तव्ये योग्यप्रकारे पार पाडणे अभिप्रेत आहे. प्रत्येक शासकीय अधिकाऱ्याने नेहमीच वरिष्ठांनी नेमून दिलेल्या कर्तव्याप्रती नितांत सचोटी राखणे, कर्तव्य परायणता ठेवणे, शासकीय अधिकाऱ्यांस अशोभनीय ठरेल अशी कोणतीही कृती अथवा गोष्ट करता कामा नये. असे असताना आपल्या कामकाजातील हलगर्जीपणा, निष्काळजीपणा सकृतदर्शनी निदर्शनास येतो. आपले हे वर्तन महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचा भंग करणारे आहे. त्यामुळे याचा लेखी खुलासा नोटीस प्राप्त झाल्यापासून ४८ तासाच्या आत सादर करावा. खुलासा मुदतीत अथवा असमाधानकारक असल्यास नियमाधीन कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त सिंह यांनी झगडे यांना नोटीसीतून दिला होता.

### पुढे काय होईल

स्मिता झगडे यांना २३ नोव्हेंबर रोजी नोटीस मिळाली. झगडे यांनी नोटीसीला उत्तर देण्यासाठी १० दिवसांची मुदत मागितली होती. आयुक्तांनी त्यांना वाढवून दिलेली मुदत शुक्रवारी (दि.२) संपली. पण, प्रशासनाकडे अद्यापर्यंत खुलासा सादर झाला नव्हता. झगडे यांचा खुलासा असमाधानकारक वाटल्यास आयुक्त हे झगडे यांची राज्य शासनाकडे तक्रार करु शकतात. त्यांची बदली करण्याची शिफारस देखील करु शकतील.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता केल्यास ५० हजार रूपये दंड

## पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून दंडाच्या रकमेत वाढ

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रस्ते, सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अस्वच्छता करणाऱ्यांकडून पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून ५० हजार रूपये दंड वसूल करण्यात येणार आहे. तसेच शहरात स्वच्छताविषयक विविध बाबींसाठी दंडाची तरतूद पालिकेने केली आहे. शहरवासीयांनी काटेकोर स्वच्छता राखावी, असे आवाहन पालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.**



"नागरिकांना अस्वच्छता करण्यापासून परावृत्त करण्यासाठी दंड रकमेत वाढ करण्यात आली आहे. नागरिकांकडून स्वच्छतेची जोपासना व्हावी, असा महापालिकेचा हेतू आहे. नागरिकांनी स्वच्छता नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

**-शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी पालिका



### दंडाची रकम

- *जैववैद्यकीय घनकचरा हा सामान्य कचऱ्यात किंवा रस्त्यावर टाकल्यास – ३५ हजार रूपये*
- *विलगीकरण न केलेला; तसेच वेगळ्या डब्यांमध्ये साठवण न केलेला कचरा आढळून आल्यास – ३०० रूपये*
- *मोठ्या प्रमाणात कचरा करणाऱ्या घटकांना – ५ हजार रूपये*
- *डासोत्पत्ती स्थानांची निर्मिती केल्यास – १० हजार रूपये*
- *सार्वजनिक सभा किंवा समारंभ संपल्यानंतर चार तासांच्या आत स्वच्छता न केल्यास – १० हजार रूपये*
- *मोठ्या प्रमाणात कचरा जाळल्यास – २५ हजार रूपये*
- *प्लास्टिकचा वापर केल्यास – ५ हजार रूपये*
- *सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास – १ हजार रूपये*
- *उघड्यावर लघुशंका केल्यास – ५०० रूपये*
- *सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण केल्यास – ५ हजार रूपये*

# जातिवाद पसरविणारे राज ठाकरे हे एकमेव नेते

## राज ठाकरे यांनीच महाराष्ट्रात सामाजिक ध्रुविकरणाचा प्रयत्न केला - जितेंद्र आव्हाड

**पुणे । महाईन्यूज ।**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे जातिवाद पसरविणारे नेते आहेत. मस्जिदीवरील भोंगे उतरविण्याबाबतचा वाद निर्माण करणारे राज ठाकरे हे महाराष्ट्रातील एकमेव आहेत. यातून त्यांनी सामाजिक ध्रुविकरणाचा प्रयत्न केला. याचा परिणाम काय झाला, तर काकडा आरती बंद झाली. मग तुम्हीच ठरवा जातीवादी कोण?



असा सवाल माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी शुक्रवारी (ता.२) पुण्यात पत्रकारांशी बोलताना उपस्थित केला.

कॉंग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या १८ व्या सेवा कर्तव्य त्याग सप्ताहाचे उद्घाटन आज आव्हाड यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद करताना हा सवाल उपस्थित केला. यावेळी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार, दीप्ती चवधरी, रमेश बागवे, मोहन जोशी, वीरेंद्र कराड आदी उपस्थित होते. आव्हाड म्हणाले, "राष्ट्रवादी कॉंग्रेस हा सर्व धर्मांना सोबत घेऊन जाणारा पक्ष आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसने कधीच जातिवाद केला नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे दैवत आहेत. अशा महाराष्ट्रातील दैवताचा अपमान होत असताना महाराष्ट्र शांत कसा?. काही लोक महाराष्ट्राचे स्वास्थ्य बिघडविण्यासाठी सातत्याने छत्रपतींच्या चारित्र्यावर हल्ला करत आहेत. आपण मात्र त्याकडे दुर्लक्ष करत आहोत.

### संविधान अन काँग्रेसमुळे देश एकसंध

**भारतीय संविधानाने अधिकार दिला, तर काँग्रेसने देश उभा केला आहे. काँग्रेसची भूमिका सर्वसमावेशक आहे. द्वेषाने देश कधीच जोडला जाणार नाही. महात्मा गांधी, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी देशासाठी बलिदान दिले आहे. मतभेद विसरून विचारांची देवाण-घेवाण करणारा पक्ष म्हणून काँग्रेसची ओळख आहे. कोणाला संपविण्याचा विचार कधीच काँग्रेसने केला नाही. त्यामुळे काँग्रेसच देशाला एकसंध ठेवू शकतो. असे मत जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी व्यक्त केले.**

# बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या कार्यकर्त्यांचा उद्या जाहीर मेळावा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रशासनातील अधिकारी आणि लोकप्रतिनिधींची बैठक घेणार

**पुणे । महाईन्यूज ।**

**बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या पुण्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा येत्या रविवारी (ता.४) पुणे शहरात जाहीर मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात पक्षाच्यावतीने पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे. शिवाय अन्य पक्षातील काही पदाधिकारी बाळासाहेबांची शिवसेना पक्षात प्रवेश करणार असल्याचे या पक्षाचे शहरप्रमुख प्रमोद भानगिरे यांनी सांगितले.**

हा मेळावा नाना पेठेतील महात्मा फुले हायस्कूल (अहिल्याश्रम) येथे रविवारी दुपारी चार वाजता होणार असून, या मेळाव्याला कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार भरत गोगावले, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे, नरेश म्हस्के आदी उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, पुणे शहरातील



समस्या आणि प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रशासनातील अधिकारी आणि लोकप्रतिनिधींची बैठक घेणार असल्याचेही भानगिरे यांनी यावेळी सांगितले.

# संविधान दिनानिमित्त तीन डिसेंबरसह तीन दिवस मोफत बससेवा

**पुणे । महाईन्यूज ।**



संविधान दिनाचे औचित्य साधून पर्यटन विभागाकडून तीन डिसेंबरसह सात आणि आठ डिसेंबर रोजी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्किट टूर' आयोजन करण्यात येणार आहे. याअंतर्गत पर्यटन संचालनालयाच्या पुणे विभागीय पर्यटन कार्यालयाकडून मोफत सहल, बससेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या टूर सर्किटमध्ये सिम्बॉयसिस महाविद्यालय येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्युझियम व मेमोरिअल, आगाखान पॅलेस आणि तळेगाव दाभाडे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर निवासस्थान या स्थळांचा समावेश आहे.

या सहलीत सहभागी होणारे पर्यटक, नागरिकांना पर्यटन विभागामार्फत गाइड, चहा व अल्पोपाहार या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील. इच्छुकांनी नाव नोंदणीसाठी अजयकुमार कुलकर्णी ( क्रमांक ८०८००३५१३४) यांच्याशी संपर्क साधावा. या मोफत सहलीचा लाभ घेण्याचे आवाहन विभागीय पर्यटन कार्यालयाच्या सहायक संचालिका सुप्रिया करमरकर- दातार यांनी केले आहे.

# धमक्या देऊ नका चर्चेसाठी बेळगावात जाणार!

## महामार्गावर आरटीओ, पोलीस असणार 24 तास ऑन ड्युटी

**पुणे । महाईन्यूज ।**

कर्नाटकातील मराठी भाषिकांशी चर्चा करण्यासाठी ६ डिसेंबरला बेळगावला जाणार आहे. आम्हाला कर्नाटक सरकारसोबत कोणताही संघर्ष करायचा नाही. तुम्ही कशासाठी संघर्ष वाढवत आहात. आम्ही कर्नाटकमध्ये येणार धमक्या देऊ नका, अशा शब्दात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री व पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी कर्नाटक सरकारला बजावले.

कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या आदेशावरून तेथील मुख्य सचिवांनी महाराष्ट्राच्या



मुख्यसचिवांना पत्र लिहून महाराष्ट्राच्या मंत्र्यांनी कर्नाटक दौऱ्यावर येऊ नये सांगितले आहे. त्याबाबत चंद्रकांत पाटील यांना पुण्यात पत्रकारांशी विचारले. त्यावेळी पाटील म्हणाले, 'कर्नाटकमधील ८६५ गावांमधील मराठी भाषकांना महाराष्ट्र सरकारतर्फे काय सुविधा देऊ शकतात यावर चर्चा करण्यासाठी मी ३ डिसेंबर रोजी बेळगावला जाणार होतो. पण आता ६ डिसेंबर रोजी बेळगावला जाणार आहे. कर्नाटक सरकारने त्यांचे नागरिक म्हणून या गावातील नागरिकांना सुविधा द्याव्यात. पण आम्ही देत असलेल्या सुविधांमुळे त्यांचे समाधानी होत असल्यास फायदा आहे. तुम्ही संघर्ष का वाढवत आहात? तुम्ही बंदी करू करून आम्ही थांबणार नाही, धमक्या देऊ नका. आम्ही चिथावणी देण्यासाठी नाही तर समन्वयाने चर्चा करण्यास जात आहोत.' दरम्यान, कर्नाटक सरकारने जत तालुक्यातील गावांसाठी पाणी सोडले आहे. त्यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांनी या पाण्यात मुख्यमंत्र्यांनी जलसमाधी घ्यावी अशी केली. त्यावर पाटील म्हणाले, " राऊत यांना भूगोल कळतो का? जत तालुक्यातील १५ टेंभू व म्हैसाळ जलसिंचन योजनेतून पाणी दिले जाते, उर्वरित ४५ गावांसाठी दोन हजार कोटींचा प्रकल्प मंजूर केला आहे. त्याचे काम जानेवारीत पूर्ण होईल. राऊत यांनी सकाळी उठून काही बोलायची सवय लागली आहे, अशी टीका केली.

### हात जोडतो उदयनराजेंनी विषय संपवावा

राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या वक्तव्यावरून निर्माण झालेल्या वादावर पाटील म्हणाले, 'राज्यपालांच्या वाक्याचे मी समर्थन करणार नाही. त्यांनी काळजी घ्यायला हवी होती. राज्यपालांच्या मनात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अनादर नाही, असे असते तर चालत शिवनेरी किल्ल्यावर चालत गेले नसते.

खासदार उदयनराजे भोसले यांना हात जोडून विनंती आहे की राज्यपालांकडून बोलण्यात एखादी चुकीची गोष्ट असेल तर त्यांनी मोठ्या मनाने हा विषय आता संपवावा."

### अजित पवार यांच्या भाकितावरून टोला

राज्यपालांच्या राजीनाम्यासंदर्भात अजित पवार यांनी "राज्यपालांना त्या पदावर रहायचे नाही, आम्हालाही ते नको आहेत. पण पाच डिसेंबरचे मतदान झाल्यानंतर कोश्यारी राजीनामा देतील. असे भाकीत व्यक्त केले.

### महाराष्ट्र राज्यऑटो रिक्षा चालक-मालक संघटना संयुक्त कृती समितीची परिषद पिंपरी येथे उत्साहात

# रिक्षा चालक मालकांचे प्रलंबित प्रश्न सरकारने सोडावेत!

## बाबा कांबळे यांची अध्यक्षपदी एकमताने निवड



पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड मध्ये राज्यभरातील सर्व रिक्षा चालक मालकांची संयुक्त कृती समिती स्थापन असून या समितीच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे अध्यक्ष कष्टकऱ्यांचे नेते बाबा कांबळे यांची एकमताने सर्वांनी निवड केली आहे. महासचिव पदी कासम मुलाणी, कार्याध्यक्षपदी वैजनाथ देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

पिंपरीत राज्यभरातील रिक्षा चालक-मालक संघटनांच्या प्रतिनिधींची परिषद मोठ्या उत्साहात पार पडली. नांदेड येथील वैजनाथ देशमुख परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते. राज्यभरातून संघटनेचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी अध्यक्षपदासह इतर पदांच्या निवडीचा ठराव करण्यात आला असल्याचे वैजनाथ देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले.

या वेळी नरेंद्र गायकवाड (नांदेड) गफारभाई नदाफ (कराड) आनंद तांबे ,बापू भावे (पुणे) रामभाऊ पाटील फिरोज मुल्ला,(सांगली) कासम मुलाणी (मुंबई) आनंद चौरे,रवी तेलरंदे, (नागपुर) राहुल कांबळे ( कल्याण डोंबिवली), तानाजी मासलकर, बाळू फाळके (सोलापूर), शिवाजी गोरे, आशिष देशपांडे (ठाणे), बल्लूर स्वामी (इचलकरंजी) सानी हुमने,अब्बास भाई (चंद्रपूर) आदीसह राज्यभरातून विविध संघटनांचे प्रतिनिधी, रिक्षा चालक-मालक उपस्थित होते.

या वेळी बाबा कांबळे म्हणाले की, रिक्षा चालक मालकांच्या हक्कासाठी संपूर्ण आयुष्यभर मी लढा दिला आहे. पुढेही देत राहणार आहे. रिक्षा चालकांच्या समस्या सुटेपर्यंत रस्त्यावरची लढाई लढणार आहे. रिक्षा चालक-मालक बांधवांना चुकीच्या मार्गाला घेऊन जाणे हे मनाला पटणारे नाही कायद्याच्या चौकटीत राहूनच न्यायासाठी लढा दिला आहे. त्यामुळे अनेकांनी मला साथ दिली आहे. स्वर्गीय शरद राव यांनीही कृती समिती स्थापन केली आहे याचे अध्यक्ष स्वर्गीय शरद राव होते त्यांच्या निधनानंतर हे अध्यक्ष पद मला मिळणार होते परंतु त्यावेळेस ते नाकारले होते.परंतु आज महाराष्ट्रात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे आणि सर्वांनी एकमताने ठराव मंजूर केल्यामुळे मी कृती समितीच्या अध्यक्षपदी माझी निवड केली, स्वर्गीय शरद राव यांच्या स्वप्नातील कृती समिती निर्माण करून त्यांचे राहिलेले गुरुवारी सर्व कार्य या समितीच्या मार्फत संपूर्ण करणार असल्याचे बाबा कांबळे म्हणाले. जबाबदारी वाढली असून रिक्षा चालकांचे प्रश्न सोडविण्यासाठी दिवसरात्र मेहनत करणार असल्याचेही कांबळे यांनी सांगितले.

### समितीतून काही प्रतिनिधींची हकालपट्टी

ऑटो रिक्षा चालक-मालक संयुक्त कृती समिती, महाराष्ट्र या वेळी करण्यात आली. पुणे येथे रिक्षा चालकांच्या हितासाठी टू व्हीलर विरोधी समिती स्थापन करण्यात पुढाकार घेतला असे बाबा कांबळे म्हणाले. मात्र या समितीमध्ये, बोगस रिक्षा संघटनांचा प्रवेश झाल्यामुळे, ही समिती बरखास्त करण्याचा निर्णय ठराव मंजूर करण्यात आला असल्याचे बाबा कांबळे यांनी सांगितले. या पुढे पुणे शहरातील रिक्षा संघटनेच्या वतीने कृती समितीच्या माध्यमातून बेकायदेशीर टू व्हीलर विरोधीचा लढा लढला जाणार आहे. याला पुणे, पिंपरी चिंचवड मधील सर्व रिक्षा संघटना व रिक्षा चालक मालकांचा देखील पाठिंबा आहे. महाराष्ट्रात काही चुकीची लोक रिक्षा संघटनांचे प्रतिनीधीत्त्व करत आहेत. ते रिक्षा चालकांची दिशाभूल करत आहेत. टू व्हीलर विरोधी समिती समिती स्थापन करून लोकांची फसवणूक काही लोक करत आहेत. २८ नोव्हेंबर रोजी शांतता मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनाला हिंसक वळण देत रिक्षा चालकांना भडकविण्याचे कामे केली. या मुळे २ हजार ५०० गोरगरीब रिक्षा चालकांवर गुन्हे दखल झाले आहे. याप्रकरणी दोषी असलेल्या बघतोय रिक्षावाला संघटनेचे अध्यक्ष केशव क्षिरसागर व ईतर काही व्यक्तींची समितीतून हकालपट्टी करण्याचा ठराव देखील यावेळी मंजूर करण्यात आला, आहे. या पुढे केंद्र व राज्य सरकारने पुणे येथील टू व्हीलर बाइक विरोधी कृती समितीशी कोणताही व्यवहार करू नये, असा ठराव देखील करून राज्य सरकारला पाठविण्यात येणार असल्याचे बाबा कांबळे यांनी सांगितले.

### समितीच्या बैठकीत हा ठराव झाला

महाराष्ट्रामध्ये सर्व शहरांमध्ये टू व्हीलर रॅपिडो, ओला-उबेरमुळे रिक्षा वाहतुकीला फटका बसला आहे. त्यामुळे त्या विरोधात आंदोलन करणे. रिक्षा चालक मालकांच्या कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यासाठी पाठपुरावा करणे. यासह अनेक मागण्यांचा ठराव करण्यात आला.

---

### स्मार्ट सिटीअंतर्गत पीपीपी तत्वावर राज्यातील पहिला उपक्रम

# जगताप डेअरी चौकातील स्मार्ट टॉयलेटचे प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते लोकार्पण

## इंटिग्रेटेड सिस्टीम आणि सेन्सर्स युक्त स्मार्ट टॉयलेटचा नागरिकांनी वापर करण्याचे आवाहन

पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीमार्फत शहरातील नागरिकांसाठी जगताप डेअरी चौक परिसरात पीपीपी तत्वावर उभारण्यात आलेल्या स्मार्ट टॉयलेटचे (स्मार्ट सार्वजनिक शौचालय) पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रशासक तथा स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.**

स्मार्ट सिटी मार्फत शहरामध्ये नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी १५ वर्षाच्या कालावधीकरीता पीपीपी तत्वावर (सार्वजनिक खाजगी भागीदारी) महिला व पुरुष असे स्वतंत्र कक्ष असलेले स्मार्ट सार्वजनिक शौचालय उभारण्यात येत आहे. मेडिनीला हेल्थ केअर प्रा. लि. द्वारा संचलित २६ ठिकाणी ई-टॉयलेटचे काम सूरू आहे. जानेवारी २०२३ पर्यंत संपूर्ण ई-टॉयलेटचे काम पूर्ण करण्यात येणार आहेत. गुरुवारी सायंकाळी या उपक्रमातील जगताप डेअरी चौकातील पहिल्या स्मार्ट टॉयलेटचा लोकार्पण कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमावेळी शहर अभियंता मकरंद निकम, सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, महाव्यवस्थापक (इन्फ्रा.)



मनोज सेठिया, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत कोल्हे तसेच मेडिनीला हेल्थ केअर प्रा. लि. व सल्लागार प्रतिनिधी उपस्थित होते. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी शहरामध्ये स्मार्ट टॉयलेट ही संकल्पना राबविण्यात आली आहे. स्मार्ट टॉयलेट आधुनिक सुविधांनी परिपूर्ण आहे. ही इलेक्ट्रॉनिक पद्धतीने काम करणारी शौचालये आहेत. यामध्ये फ्लशिंग ऑपरेट करणे सोपे असून शौचालयाचा दरवाजा उघडल्याने टॉयलेट पॅन आपोआप फ्लश होते. बटण दाबल्यावर सहज फ्लशिंग सुनिश्चित करते.

### असे काम करेल स्मार्ट टॉयलेट..

स्मार्ट टॉयलेटमध्ये ऑटोमॅटिक फ्लशिंग सेन्सर, व्हॉईस असिस्टंट, फॅन, सीलिंग लाईट, पॉवर बॅकअप आदी सुविधा आहेत. या टॉयलेटचे प्रात्यक्षिक शौचालयाच्या गेटवर लिखित स्वरूपात दाखवण्यात आले आहे. टॉयलेटची डाव्या बाजूची लाईट पेटत राहते. जर लाल रंगाचा दिवा पेटत असेल तर आत कोणीतरी व्यक्ती असेल आणि हिरव्या रंगाचा सिग्नल असेल तर समजून घ्या की, हे शौचालय रिकामे आहे. जेव्हा हिरवा दिवा चालू असतो, तेव्हा त्याच्या खाली नाणी टाकण्यासाठी एक बॉक्स असतो, ज्यामध्ये १ ते ५ रुपये पर्यंतची नाणी टाकता येतील. नाणे टाकल्यानंतर सेन्सर काम करेल आणि नंतर गेट उघडेल. गेट उघडल्यानंतर व्यक्ती आत गेल्यावर ऑटोमॅटिक प्लस मिळेल, यासोबतच मॅन्युअल प्लसचीही सोय आहे. एखाद्या व्यक्तीने गेटमध्ये प्रवेश केल्यावर आणि गेट बंद करताच, एक्झॉस्ट फॅन आणि लाईट चालू होतात. शौचालयात प्रवेश करण्यापूर्वी अनेक प्रकारचे इंडिकेटर लावले जातात. जेणेकरून शौचालयात किती पाणी आहे हे कळते. स्मार्ट टॉयलेटच्या वरती पाण्याची टाकी बसवण्यात आली असून १० वेळा वापर केल्यानंतर शौचालय स्वयंचलित तंत्रज्ञानाने फ्लश केला जाईल आणि पूर्णपणे स्वच्छ होईल.

## संपादकीय »

# स्त्रीमुक्तीचा मुद्दा धर्मवादाच्या वेठीला

*स्त्रीमुक्तीच्या किंवा व्यक्तिस्वातंत्र्याच्या कोणत्याही मुद्द्याचा धर्मवादी राजकारणाच्या वेदीवर बळी दिला जातोय. धर्मवादी राजकारणाच्या पकडीत व्यक्तिस्वातंत्र्याची कोंडी केली जात आहे.*

राजकारणात जेव्हा धर्मांधता आणि धर्मद्वेष प्रभावी असतो,तेव्हा स्त्रीमुक्तीच्या प्रश्नांची कशी वासलात लावली जाते, याचे ताजे उदाहरण म्हणजे श्रद्धा वालकर खून प्रकरण. महाराष्ट्रातील प्रमुख शहरात या प्रश्नावर मूक मोर्चा काढण्याचे हिंदुत्ववादी म्हणवून घेणाऱ्या एका संघटनेने जाहीर केले आहे. त्याविषयीच्या प्रसिद्धी फलकामध्ये म्हटले आहे की, श्रद्धा वालकर या हिंदू भगिनीची हत्या केल्याप्रकरणी गुन्हेगार आफताबला फाशी देण्यात यावी. याच प्रसिद्धी फलकात 'लव्ह जिहाद'विरूद्ध कायदा करावा आणि गोहत्याबंदीच्या कायद्याची अंमलबजावणी करावी, असेही म्हटले आहे.

या मोर्चाचा श्रद्धा वालकर या व्यक्तीवर किंवा तिच्या आप्तेष्टांवर झालेल्या अन्यायाशी खरंच काही संबंध आहे का, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. कारण असे की, यात श्रद्धा वालकर यांचा उल्लेख 'हिंदू भगिनी' असा करण्यात आला आहे. आजवर या देशात अनेक स्त्रियांचा असा खून झालेला आहे. आणि बहुतांश वेळी हा खून त्यांच्या नवऱ्यांनी किंवा अगदी जवळच्या नातेवाईकांनी केलेला आहे आणि ते बहुसंख्याक समाजातील होते.

अशा वेळेला अशा संघटनांनी आमच्या हिंदू भगिनींवर अत्याचार झाला म्हणून मोर्चा काढलेला नाही. त्यावेळेस बहुधा अत्याचारी स्त्री त्यांना त्यांची भगिनी वाटलेली नव्हती. याचा अर्थ असा की, या संघटनांना अत्याचारित महिलेवरील अन्यायापेक्षा महत्त्वाचे वाटते, ते हल्लेखोर अफताबचे मुस्लिम असणे. म्हणजे स्त्रीमुक्तीचे, स्त्रीअत्याचाराचे प्रश्न यांच्यासाठी केवळ आपल्या कम्युनल राजकारणासाठीचे हत्यार आहेत. तसे नसते तर आजवरच्या कित्येक भगिनींच्या अत्याचाराविरुद्ध या संघटना रस्त्यावर उतरलेल्या दिसल्या असत्या. या ठिकाणी एका महत्त्वाच्या मुद्द्याची देखील नोंद घेतली पाहिजे. आजवर देशभरात जेव्हा जेव्हा स्त्रियांवरील पुरुषी मानसिकतेतून झालेल्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवले गेले आहेत, त्या महिला संघटना कधीही हिंदुत्ववादी विचाराच्या नव्हत्या. स्त्रियांच्या अत्याचाराविरुद्ध कायदे करणे, त्यासाठी सरकारशी संघर्ष करणे यामध्ये या संघटना सहभागी नसतात. असल्या तरी नियमाला अपवाद म्हणूनच. स्त्रीमुक्तीचा प्रश्न, स्त्री-पुरुष समानतेचा मुद्दा यामध्ये ते काम करत नाहीत. अन्याय होणाऱ्या बहुतांश महिला हिंदू असल्या तरी. अत्यंत आधुनिक स्त्रियादेखील आपल्याला कमालीच्या जाचक ठरणाऱ्या नात्यामधून लगेच बाहेर येऊ शकत नाहीत. आपल्या जीवाला धोका आहे




# पाण्याचा वायदे बाजार नको!



वायदे बाजार म्हणजे भविष्यातील सौदे (फ्यूचर आणि डेरिव्हेटिव्ह) करण्याचे ठिकाण. वस्तूचे दर अस्थिर असतात, त्या वेळी 'फ्यूचर सौदा' करून त्या वस्तूचा भविष्यात करावयाच्या व्यवहाराचा दर निश्चित करता येतो. उदा.- आजच्या दराने एक क्विंटल कांद्याचे बुकिंग केल्यास एक महिन्यानंतर प्रत्यक्षात कांद्याचे दर काहीही असले तरी सौद्यानुसार महिनाभरापूर्वी निर्धारित केलेला दर बंधनकारक असतो. यामुळे बाजारातील अनिश्चितता काही अंशी कमी करून व्यावहारिक निर्णय घेता येतात, जोखीम कमी करता येते. आपल्याकडेही वायदेबाजार आहेच. पण अमेरिकेत समभाग बाजारांसाठी जसे न्यू यॉर्कचे 'वॉल स्ट्रीट' जगात मोठे, तसे शिकागो शहरातील 'शिकागो र्मकटाइल एक्स्चेंज' (सीएमई) कृषी उत्पादने, परकीय चलन, ऊर्जा, व्याजदर, खनिजे, इंधन तेल आणि शेअर्स, स्टॉक निर्देशांक इत्यादींचे फ्यूचर सौदे करण्यासाठी मोठे. आता या कंपनीने पाण्याचे फ्यूचर ट्रेडिंग करण्यासाठी पावले उचलली आहेत. ही वेळ का आली?

हवामान बदलाच्या (क्लायमेट चेंज) पार्श्वभूमीवर स्थळ-काळानुरूप (जिओ-टेम्पोरल) पाण्याच्या उपलब्धतेबाबत शाश्वती राहिलेली नाही. अतिवृष्टी आणि दुष्काळ यांसारख्या टोकाच्या घटना घडण्याची शक्यता वाढणार असल्याचे अनुमान विविध अभ्यासांतून काढण्यात आले आहे. पाण्याची उपलब्धता अनिश्चित झाली तर कृषी, उद्योग, ऊर्जा, पर्यावरण आणि पिण्यासाठी या सर्वच घटकांच्या मागणीएवढे पाणी पुरवण्यावर मर्यादा येणार. त्यामुळे ज्या वेळी मागणी जास्त आणि पुरवठा कमी अशी परिस्थिती निर्माण होईल त्या वेळी पाण्याच्या किमती अस्थिर होतील. असे झाल्यास पाण्याभोवती असलेले उद्योग आणि सेवा अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडतील. ही समस्या टाळण्यासाठी अमेरिकेत कॅलिफोर्निया राज्यात २०२० पासूनच, पाण्याचे 'फ्यूचर ट्रेडिग' सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. पण समस्या खरोखरच टळेल का?

याच कॅलिफोर्निया राज्यात तापमानात विक्रमी वाढ झाली असून नुकत्याच लागलेल्या वणव्यामुळे मोठ्य़ा प्रमाणात जंगले आणि वस्त्या भस्मसात झाल्या आहेत. त्यामुळे आधीच दुष्काळामुळे त्रासलेल्या या राज्यात भविष्यात पाण्याचे संकट अधिक गहिरे होणार आहे. अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरले, प्रशांत महासागराच्या किनाऱ्याला लागून असलेले हे राज्य आकाराने त्या देशात तिसऱ्या क्रमांकावरले. अमेरिकेतली सर्वाधिक लोकसंख्या असलेले हे राज्य आहेच, पण अधिक लोकसंख्येच्या ५० अमेरिकी शहरांपैकी आठ शहरे याच राज्यात आहेत. येथील सोन्याच्या खाणी, कृषी उत्पादन, हॉलीवूड, सिलिकॉन व्हॅली आणि औद्योगिक क्षेत्राच्या वाढीमुळे या राज्याची भरभराट झाली असून अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत १३ टक्के हिस्सा या राज्याचा आहे. जर हे राज्य स्वतंत्र देश म्हणून विचारात घेतले तर या राज्याची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झाली असती आणि आपल्या भारताचा क्रमांक त्यानंतर लागला असता.

कृषी-विकास, उद्योग-धंदे, वित्तीय-व्यवस्था, माहिती-तंत्रज्ञान, ऊर्जा-पर्यावरण आणि लॉस एंजलिससारखे अमेरिकेतील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर इथे असल्याने पाण्याची मागणी या सर्वच क्षेत्रांत सतत वाढणारी आहे. 'अमेरिकेतील सर्वात जास्त पाणी वापरणारे राज्य' अशीही या कॅलिफोर्नियाची ख्याती आहे.

# पाण्याचे कोकणी दुष्टचक्र

**वाहून जाणारे पाणी अडवून कोकणातील महिलांच्या डोक्यावरचा हंडा खाली उतरविण्यासाठी सरकारने न्यायाची भूमिका घ्यावी. त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती व आर्थिक नियोजन हवे. नाहीतर अतिवृष्टीमुळे पावसाळ्यात नाकातोंडात पाणी आणि उन्हाळ्यात पाणीटंचाईमुळे डोळ्यात पाणी हे कोकणातील दुष्टचक्र कसे थांबणार?**



कोकणचा चेहरामोहरा बदलणाऱ्या रिफायनरीचे स्वागतच आहे. रिफायनरीसाठी कोयनेचे पाणी वापरायचा निर्णय योग्य आहे. परंतु, तेल शुद्धीकरण प्रकल्पाची १.५५ टीएमसी पाण्याची गरज भागल्यावर उर्वरित पाणी किमान वाटेतील कोकणातील गावांना पिण्याकरिता व सिंचनाकरिता दिले पाहिजे. कोयना धरण सातारा जिल्ह्यात असून लांबी ८०७ मीटर तर उंची १०३ मीटर आहे. कोयना धरणाची साठवण क्षमता १०५.२७ टीएमसी (अब्ज घनफूट) आहे. सन २००५ साली राज्य सरकारने नेमलेल्या पेंडसे कमिटीने सकारात्मक अहवाल दिला. तसेच, जलसंपदा विभागले सन २०१८ साली या प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी निविदा काढली; परंतु, सरतेशेवटी वर्कऑर्डर म्हणजे कार्यदिश न काढल्याने गाडी पुढे सरकली नाही. सागरजल क्षारमुक्त करण्याचा पर्याय खर्चिक तर आहेच शिवाय पर्यावरणप्रेमी नाही. अर्जुना नदीचा पर्याय समोर आहे. परंतु, ते पाणी प्रामुख्याने सिंचनाकरिता वापरायचे असा निर्णय झाला आहे. नाही तर प्रकल्पाने शेतकऱ्यांचे पाणी पळविले, अशी ओरड सुरू होईल. शेवटी कोयनेचे वाशिष्ठी नदीत जाणारे पाणी रिफायनरी आणि पेयजल व सिंचनासाठी वापरणे व्यवहार्य आहे. परंतु, हे पाणी नवी मुंबई किंवा तळकोकणात नेणे मात्र व्यवहार्य नाही. महाराष्ट्रात ऊसक्षेत्र साडेपाच लाख हेक्टर असून ते एकूण शेतीच्या केवळ तीन टक्के आहे. मात्र, ऊस सिंचनासाठी ६० टक्के जलवापर होतो आणि याच जिवावर पश्चिम महाराष्ट्रातील साखरसम्राट राज्याचे शंभर टक्के राजकारण करत आले. सिंचनाचे पाणीच ऊस पितो आणि दुसरीकडे १५० इंच पाऊस पडणाऱ्या कोकणात महापुरामुळे प्रचंड जीवित व वित्तहानी होते. तरीही, उन्हाळ्यात बायाबापड्यांना पिण्याच्या पाण्याकरीता डोक्यावर हंडा घेऊन मैलोन् मैल पायपीट करावी लागते. सह्याद्रीच्या खोऱ्यातल्या १५० इंच पावसाच्या पाण्याचा वापर जलसंधारणासाठी करून राज्यात उत्तम जलव्यवस्थापन निर्माण होण्याची गरज आहे. वाशिष्ठी, सावित्री, शास्त्री, जगबुडी, मुचकुंदी, गांधारी, वैतरणा आदी कोकणातील नद्यांचा उगम सह्याद्रीच्या खोऱ्यात होतो. रत्नागिरी जिल्ह्यातील नद्यांची जलक्षमता ६१२ टीएमसी म्हणजे कोयना धरणापेक्षा सहापट जास्त आहे. परंतु, हे बहुतेक सारे पाणी समुद्रात वाहून जाते.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### भाजपच्या मिशन बारामतीच्या प्रचाराचा केंद्रबिंदू इंदापुरात

। इंदापूर । महाईन्यूज ।

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अगोदरच कित्येक महिने भारतीय जनता पक्षाने 'मिशन बारामती' अभियान राबवून बारामती ताब्यात घेण्यासाठी तयारी सुरू केली आहे. त्याकरता गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केलेले माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना राजकीय ताकद दिली जात आहे. गेल्या दोन महिन्यात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि केंद्रीय जलशक्ती व अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी बारामती लोकसभा मतदार संघाच्या दौऱ्यात इंदापुरात स्थानिक प्रश्नांचा आढावा घेतला.

# 'जत तालुक्यातील 65 गावांसाठी विस्तारीत म्हैसाळ सिंचन योजना दीड वर्षात पूर्ण करणार'!

## सिंचन योजनेसाठी दोनशे कोटींचा तातडीचा निधी मंजूर, मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

। जत । महाईन्यूज ।

जत तालुक्यातील वंचित ६५ गावासाठी विस्तारित म्हैसाळ सिंचन योजना येत्या दीड वर्षात पूर्ण करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत झालेल्या बैठकीत दिले. याचबरोबर योजनेसाठी दोनशे कोटींचा तातडीचा निधीही मंजूर केला. जत तालुक्याच्या पूर्व भागातील ६५ गावांना पाणी मिळण्याच्या दृष्टीने उपाययोजनांबाबत आज मुंबईमध्ये सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीत आमदार विक्रमसिंह सावंत यांनी आक्रमक भूमिका मांडली. जत तालुक्याचा पाण्याचा प्रश्न मांडत सध्याची परिस्थिती व तालुक्यातील म्हैसाळ योजनेच्या पूर्णत्वासाठी तातडीने निधी मिळणे किती गरजेचे आहे हे स्पष्ट केले. यावर मुख्यमंत्र्यांनी दोनशे कोटींचा तातडीचा निधी मंजूर करुन पुरवणी अर्थसंकल्पामध्येही निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच जसे काम सुरू होईल तसे निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.



या बैठकीस पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, सांगलीचे पालकमंत्री ना. सुरेशभाऊ खाडे, खा. संजयकाका पाटील, सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी तसेच पाटबंधारे विभागाचे व विविध अधिकारी उपस्थित होते.

# शिंदे सरकारची डोकेदुखी वाढली!

। मुंबई । महाईन्यूज ।

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावरुन महाराष्ट्रात राजकारण तापलंय. पाणी प्रश्नावरुन जत तालुक्यातल्या काही गावांमध्ये कर्नाटकचे झेंडे फडकले. अशातच सोलापूरमधील २८ गावांनी कर्नाटकात जाण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सोलापूर आणि सांगलीतील काही जिल्ह्यांवर दावा सांगितला आहे.

बोम्मई यांच्या या दाव्यावर महाराष्ट्रात तीव्र पडसाद उमटलेले आहेत. राज्यातील एकही गावच काय जमिनीचा तुकडाही कर्नाटकाला जाऊ नये म्हणून राज्यसरकार जोरदार प्रयत्न करत आहे. दरम्यान आता हा वाद चालू असतानात पुन्हा महाराष्ट्रात आणि तेलंगणा हा वाद चालू होण्याची चिन्हे आहेत.

कारण नांदेड जिल्ह्यातील सीमेवर असलेल्या धर्माबाद तालुक्यातील 25 गावांनीही आता तेलंगणा राज्यात जाण्याचा इशारा राज्य सरकारला दिला आहे. अनेक वर्षांपासून या गावांना मूलभूत सुविधा मिळत नसल्याने येथील लोक त्रस्त असल्याचं सांगितलं जात आहे. या सर्व गावांचे सरपंच आणि त्यांचे कार्यकर्ते यांची बासर येथे एक बैठक झाली.

## नांदेडमधील 25 गावंही म्हणतात महाराष्ट्रात नाही रहायचं

**नांदेड जिल्ह्यातील सीमेवर असलेल्या धर्माबाद तालुक्यातील 25 गावांनीही आता तेलंगणा राज्यात जाण्याचा इशारा राज्य सरकारला दिला आहे. अनेक वर्षांपासून या गावांना मूलभूत सुविधा मिळत नसल्याने येथील लोक त्रस्त असल्याचं सांगितलं जात आहे. या सर्व गावांचे सरपंच आणि त्यांचे कार्यकर्ते यांची बासर येथे एक बैठक झाली.या बैठकीमध्ये त्यांनी तेलंगणामध्ये सामील होण्याबाबत अनुकूलता दर्शवली आहे. गावचा विकास नाही, पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही, वाढता भ्रष्टाचार, रस्त्याची दुरवस्था, कामाच्या संधी या सगळ्यांचा गोष्टींचा त्रास या गावातील लोक सहन करत आहेत. त्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला असल्याचे सांगितले जाते.**

या बैठकीमध्ये त्यांनी तेलंगणामध्ये सामील होण्याबाबत अनुकूलता दर्शवली आहे. गावचा विकास नाही, पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही, वाढता भ्रष्टाचार, रस्त्याची दुरवस्था, कामाच्या संधी या सगळ्यांचा गोष्टींचा त्रास या गावातील लोक सहन करत आहेत. त्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला असल्याचे सांगितले जाते.



# "शिंदे गटात लवकरच स्फोट होईल"

## संजय राऊतांचं मोठं विधान

। मुंबई । महाईन्यूज ।

शिंदे गटात लवकरच स्फोट होईल, असं मोठं विधान खासदार संजय राऊत यांनी केले आहे. संजय राऊत हे कालपासून नाशिक दौऱ्यावर आहेत. आज त्यांनी नाशिकमध्ये पत्रकार परिषद घेत शिंदे सरकारवर जोरदार टीका केली. तसेच शिंदे गटात गेलेल्या आमदार-खासदारांनी पुन्हा निवडून दाखवावे, असे आव्हानही त्यांनी दिले. "काही आमदार सोडून गेले म्हणून शिवसेना संपली, असं होत नाही. ४० नेते गेले तरी, पक्ष जमीनीवर आहे. महाराष्ट्रात कोणत्याही क्षणी तुम्ही निवडणुका घेतल्या, तरी आम्ही जिंकून येऊ. महानगरपालिका असेल किंवा अन्य



निवडणुका असतील या निवडणुका भीतीपोटी टाळल्या जात आहेत. शिवसेना नवीन चिन्हावरसुद्धा विजयी होईल, शिवसेनेला कुठेही तडा गेलेला नाही", असेही ते म्हणाले.

"राणेंच्या बोलण्याकडे लक्ष देण्याची गरज नाही"

दरम्यान, भाजपा नेते नारायण राणे यांनी संजय राऊत हे आता सामनाचे संपादक नाही तर सहसंपादक आहेत, असा टोला लगावला होता. त्यावरही संजय राऊतांनी प्रतिक्रिया दिली. "त्यांचे

### "लोकांच्या मनात गद्दारांबद्दल चीड"

**"नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातले जे खासदार-आमदार शिंदे गटात गेले आहेत, त्यांनी परत निवडून दाखवावे. खासदार गोडसे यांची राजकीय कारकीर्द संपली आहे. आम्ही सतत लोकांमध्ये फिरतो आहे. लोकांच्या मनात गद्दारांबद्दल चीड आहे. लोकं शिवसेनेच्या पाठिशी भक्कमपणे उभी आहेत, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली. कालपासून मी नाशिकमध्ये आहे. येथे सर्वांना भेटतो आहे. लोकं त्यांना खोकेवाले बोलतात", अशी टीकाही त्यांनी केली.**

### "शिंदे गटात लवकरच स्फोट होईल"

**यावेळी पत्रकारांनी दादा भुसे आणि सुहास कांदे यांच्यातील मदभेदाबाबत विचारले असता, "मी खासदार असलो, तरी त्यापूर्वी एक क्राईम रिपोर्टर आहे. माझा पिंड पत्रकाराचा आहे. त्यामुळे कोणाच्या डोक्यात काय सुरू आहे, ते मला चांगलं कळतं. शिंदे गटात काय सुरू आहे, हे मला माहिती आहे आणि लवकरच त्याचा स्फोट होईल", अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.**

डोक ठिकाणावर नाही. त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देण्याची गरज नाही. मी 'सामना'मध्ये ज्या पदावर होतो, त्याच पदावर आहे. मी तुरुंगात असतानाही त्याच पदावर होतो", असे ते म्हणाले.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त रविवारी मुंबईत मेगाब्लॉक नाही!

## चंद्रकांत खैरेंच्या आरोपाला गुलाबराव पाटलांचं प्रत्युत्तर

। मुंबई । महाईन्यूज ।

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथील समाधीचे दर्शन घेण्यासाठी राज्य आणि देशभरातून येणाऱ्या आंबेडकर अनुयायांची गैरसोय होऊ नयेत म्हणून रविवारी (ता.४) मध्य, पश्चिम रेल्वेवरील मेगाब्लॉक रद्द करण्याचा निर्णय घेतला आहेत.

उपनगरी रेल्वे मार्गावरील रुळांची दुरुस्ती तसेच सिग्नल यंत्रणेत काही तांत्रिक कामे करण्यासाठी दर रविवारी



नियमितपणे मेगाब्लॉक घेण्यात येते. मात्र,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवर रविवारी मध्य, पश्चिम रेल्वेवरील मेगाब्लॉक नसणार आहे. दर वर्षी महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी लाखोंच्या संख्येने अनुयायी येतात.

त्यामुळे आंबेडकर अनुयायांची गैरसोय होऊ नयेत आणि योग्य पद्धतीने गर्दीचे विभाजन करण्यासाठी रविवारी (ता.४) मध्य रेल्वेवरील सीएसएमटी ते कल्याण आणि हार्बर मार्गावरील सीएसएमटी ते पनवेल या मार्गावर मेगाब्लॉक घेतला जाणार नाही, अशी माहिती मध्य रेल्वे प्रशासनाने दिली. तर पश्चिम रेल्वेवर शनिवार आणि रविवारच्या मध्यरात्री सांताक्रुझ ते गोरेगाव दरम्यान रात्रकालीन ब्लॉक घेतला जाणार असल्याचे पश्चिम रेल्वेने सांगितले.

१२ लोकल फेऱ्या -

मध्य रेल्वेकडून महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबरला मध्य आणि हार्बर मार्गावर १२ विशेष लोकल फेऱ्या चालवण्याचा येणार आहे. याशिवाय १४ लांब पल्ल्यांच्या गाड्या चालवण्यात येणार असून आदिलाबाद-मुंबई एक्स्प्रेसला एक अतिरिक्त डबा जोडण्यात आलेला आहे.

# ब्राह्मण-बनिया परत जा, आम्ही बदला घेऊ...

## जेएनयूमध्ये भिंतींवर लिहिला जातीयवादी मेसेज

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

जेएनयू पुन्हा एकदा चर्चेच्या अग्रस्थानी आले आहे. कारण जेएनयूच्या भिंतींवर ब्राह्मण आणि बनियाविरोधात घोषणा लिहिण्यात आल्या आहेत. अन्यता रक्तपात होईल, आम्ही बदला घेऊ, अशा प्रकारच्या घोषणाही लिहिण्यात आल्या आहेत. ही घटना समोर आल्यानंतर जेएनयूमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या घरून सतत फोन येत असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणण आहे.

जेएनयूचे कुलगुरू प्रोफेसर शांतीश्री डी पंडित यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेत तत्काळ चौकशीचे आदेश दिले आहेत. परंतु जेएनयूच्या प्रशासनानेही या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. कॅम्पसमधील अशा फुटीरतावादी कारवाया अजिबात खपवून घेतल्या जाणार नाहीत. जेएनयू सर्वांचे आहे. जेएनयू टीचर्स फोरमनेही याविरोधात संताप व्यक्त केला आहे. जेएनयूच्या कॅम्पसमध्ये विविध ठिकाणी भिंतींवर ब्राह्मणविरोधी घोषणा लिहिल्या. ब्राह्मण आणि बनिया परिसर सोडा, आम्ही तुमच्यासाठी येत आहोत, आम्ही बदला घेऊ, रक्तपात होणार, अशा काही घोषणा सर्व भिंती आणि दरवाजांवर लिहिण्यात आल्या आहेत. तसेच या संदर्भातील फोटोही सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहेत.

जेएनयू टीचर्स फोरमने ट्विटरवर काही फोटोही शेअर केले आहेत. पोस्ट शेअर करताना लिहिले आहे की, डाव्या उदारमतवादी टोळ्या प्रत्येक मतभेदाच्या आवाजाला धमकावण्याचे काम करत असताना, त्यांनी परस्पर आदर, नागरी मूल्ये प्रस्थापित करणारा आणि सर्वांना समान वागणूक देणारा ईसी प्रतिनिधी निवडण्याचे आवाहनही केले आहे. हे गुंडगिरीचे अत्यंत निषेधार्ह कृत्य, असं त्यांनी लिहिलं आहे.




**जेएनयूच्या कॅम्पसमध्ये विविध ठिकाणी भिंतींवर ब्राह्मणविरोधी घोषणा लिहिल्या. ब्राह्मण आणि बनिया परिसर सोडा, आम्ही तुमच्यासाठी येत आहोत, आम्ही बदला घेऊ, रक्तपात होणार, अशा काही घोषणा सर्व भिंती आणि दरवाजांवर लिहिण्यात आल्या आहेत.**

# छत्तीसगडमध्ये मोठी दुर्घटना

### खाण दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू, काही जण अडकल्याची भीती

**। रायपूर ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



छत्तीसगडमध्ये एक मोठी दुर्घटना घडली आहे. जगदलपूर येथून ११ किलोमीटर अंतरावर मालगावमध्ये खाणीत दुर्घटना घडली आहे. खाण खचल्यानं १२ जण अडकले असल्याची प्राथमिक माहिती असून यामध्ये ७ जणांचा मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती मिळतास स्थानिक प्रशासन, पोलीस दल तातडीनं घटनास्थळी दाखल झालं. प्रशासनाकडून बचावकार्य सुरु करण्यात आलं मात्र ज्या सात जणांना बाहेर काढण्यात आलं त्या सर्वांचा मृत्यू झाला होता.

प्राथमिक माहितीनुसार खाण खचल्यानं आणखी काही लोक अडकले असल्याचं सांगितलं जात आहे. पोलीस आणि एसडीआरएफनं बचावकार्य सुरु केलं आहे. खाणीत अडकलेल्या ७ जणांना बाहेर काढण्यात आलं असून त्यातील ७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. आणखी पाच जण खाणीत अडकले असल्याचं समोर आलं. आणखी एका तासात त्यांना देखील बाहेर काढलं जाईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. घटनास्थळी पोलीस आणि स्थानिक प्रशासनाकडून बचाव कार्य करण्यात येत आहे. खाणीत आणखी पाच लोक अडकले असल्याची शक्यता आहे. अडकलेल्या लोकांना लवकरचं बाहेर काढलं जाईल, असं प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत ७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. जिल्हा प्रशासनाच्यावतीनं रायपूमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांना या घटनेसंदर्भात माहिती दिली आहे.

# दिल्ली, मुंबई, चेन्नईमध्ये ईडीचे छापे

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

मनी लाँड्रींग प्रकरणी सक्तवसुली (ईडी) संचलनालयाने शुक्रवारी दिल्ली, मुंबई, चेन्नई येथील १६ ठिकाणी छापे टाकले. छाप्यांमध्ये कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली.

सिक्योरक्लाउड टेक लिमिटेड, प्रो फिन कैपिटल सर्विसेज लिमिटेड, क्वॉंटम ग्लोबल सिक्योरिटीज लिमिटेड, यूनिटी ग्लोबल फायनानशिअल सर्विसेज प्राइवेट लिमिटेड, डेजर्ट रिवर कैपिटल प्राइवेट लिमिटेड व त्यांच्या अधिकाऱ्यांच्या कार्यालयावर छापे टाकण्यात आले. छाप्यांमध्ये १.४ कोटींची रोकड, सोने, हिरे व दागिने जप्त करण्यात आले. काही मालमत्तांचाही खुलासा छाप्यांमध्ये झाला आहे. यावेळी ईडीने विविध डिमॅट खाते, काही कागदपत्रे व डिजिटल कागदपत्रे जप्त केली. मनी लाँड्रींग कायद्यातंर्गत तपास करताना ईडीने शेअर दलालांची चौकशी केली. या चौकशीत धकादायक माहिती समोर आली आहे. शेअर व वित्तसेवा कंपन्यांच्या मालकांनी १६० कोटी रुपयांचे शेअर दिशाभूल करुन विकले. याद्वारे त्यांना कोट्यवधी रुपयांचा नफा झाला, असा आरोप आहे.

ईडीचे देशभरात छापेमारी सुरुच असते. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी ही छापेमारी सुरुच असते. गुरुवारी ईडीने नागपूर येथील सुपारी व्यापाऱ्याकडे छापा टाकला. प्रकाश गोयल, आसिफ कलीवाला, हेमंत कुमार गुलाबचंद, वसीम बावला, दिग्विजय ट्रान्सपोर्टचे हिमांशु भद्रा आदींवर छापे टाकल्याने सुपारी व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले. यामुळे एकच खळबळ उडाली. १८ घरे व अन्य ठिकाणांची तपासणी करण्यात आली. सुमारे १३० अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली. छाप्यात सुपारी व्यवहाराची बेहिशोबी कागदपत्रे मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आली. छापेमारी केलेले सर्व व्यापारी विदेशी सुपारी आयात करणारे आहेत. यापूर्वीही ते वेगवेगळ्या तपास यंत्रणांच्या रडारवर होते.

### कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जप्त



# ‘जातीनिहाय जनगणनेबाबत सरकारच्या निर्णयानंतर हालचाली‘

### महाराष्ट्रात मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) कोट्यातून आरक्षण द्यावे मोदी सकारने बंद केली अल्पसंख्याकांची शिष्यवृत्ती

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

‘जातीनिहाय जनगणनेबाबत केंद्र सरकारने निर्णय घेतला तर राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग (एनसीबीसी) त्यानुसार हालचाली करेल असे आयोगाचे नवनियुक्त अध्यक्ष व माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहीर यांनी आज सांगितले. महाराष्ट्रात मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) कोट्यातून आरक्षण द्यावे या मागणीबाबत राज्य सरकारकडून प्रस्ताव आला तर आयोग त्यावर जरूर विचार करेल असेही ते म्हणाले.

अहीर यांनी आज एनसीबीसीची सूत्रे स्वीकारली. यावेळी त्यांनी राज्यघटना व घटानाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषमता संपविण्याबाबतच्या विचारांना समोर ठेवून व बाबासाहेबांच्याच आदर्शांनुसार आयोगाचे कामकाज चालेल अशी ग्वाही दिली.



‘सबका साथ सबका विकास' ही घोषणा देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्याला ही संधी दिल्याचे अहीर म्हमाले. मात्र मोदींनी दुसऱयांदा पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारताना सेंट्रल हॉलमधील डॉ. आंबेडकरांच्या राज्यघटनेवर मस्तक टेकविले होते. अहीर यांनी मात्र वेदमंत्रांच्या घोषात आयोगाची सूत्रे स्वीकारली. यासाठी पं. जितेंद्र सर्मा यांना खास बोलावून घेण्यात आले होते. त्यांनी स्वस्तीवाचन, गणेशमंत्र व वेदमंत्रांचा घोष केल्यावरच अहीर अध्यक्षपदाच्या खुर्चीत स्थानापन्न झाले.

आयोगाचे माजी अध्यक्ष व भाजप नेते विजय सांपला यांनी अहीर यांच्याकडे सूत्रे सोपविली. आयोगाचे सचिव राजीव रंजन , भाजपचे ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर आदी उपस्थित होते. बाजपचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे यांनीही आज सकाळी अहीर यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

अहीर म्हणाले की ज्या जाती मागासवर्गीयांत येत नाहीत त्यांच्यासाठी १९९३ मध्ये एनसीबीसी आयोगाची स्थापना झाली. पण त्याला अधिकार नव्हते. पंतप्रधान मोदी यांनी २०१८ मध्ये आयोगाचे पुनरूज्जीवन करून आयोगाला शक्ती व अधिकार प्रदान केले. ओबीसी समाजाला आपले घटनादत्त अधिकार मिळविण्यासाठी तब्बल २५ वर्षांची प्रतीक्षा करावी लागली.

मोदी यांनी ओबीसी समाजाच्या आयोगाला अधिकार व शक्ती देऊन हे काम केले. देशभरात ओबीसींच्या २५१३ जाती व पोटजातींसह ५५४७ जाती हेत. महाराष्ट्रात हीच संख्या अनुक्रमे २६१ व ५८१ इतकी आहे. यापैकी अनेक ओबीसी जातींना अद्याप त्यांचे हक्क मिळालेले नाहीत. या माध्यमातून त्यांना न्याय देण्याचा आपण प्रयत्न करू.

## इडी कार्यालयात नोरा; चौकशीचा ससेमिरा काही थांबेना




अभिनेत्री आणि डान्सर नोरा फतेही कॉनमन सुकेश चंद्रशेखरच्या 200 कोटी रुपयांच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात चांगलीच अटकली आहे. याप्रकरणामूळे तिची इडीच्या अधिकाऱ्यांनकडून चौकशी सुरु आहे. या चौकशीसाठी दिल्लीतील ईडी कार्यालयात ती दाखल झाली आहे. नोराची याआधीही अनेकवेळा चौकशी करण्यात आली आहे आणि पुराव्यांच्या आधारे तिला बोलावण्यात आले आहे.

नोराला सुकेश चंद्रशेखर यांच्या बद्दल विचारण्यात येईल आणि प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग कायद्याच्या (पीएमएलए) कलमांतर्गत तिचा जवाब नोंदविला जाइल असं पीटीआयने म्हटले आहे. तर नोरा साक्षीदार म्हणून तपास यंत्रणेला मदत करत असल्याचं तिच्या प्रवक्त्याने म्हटलं आहे.

या प्रकरणी नोरा फतेहीशिवाय जॅकलिन फर्नांडिसचीही चौकशी करण्यात आली आहे. ईडीने आपल्या आरोपपत्रात अभिनेत्रीचे नाव आरोपी म्हणून ठेवले होते. गेल्या महिन्यात जॅकलिनला 2 लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर आणि तेवढ्याच रकमेच्या जामीनावर जामीन मंजूर करण्यात आला होता.

तसेच या आठवड्याच्या सुरुवातीला, पोलिसांनी पिंकी इराणीला अटक केली होती, तिने जॅकलीन फर्नांडिसची सुकेश चंद्रशेखरशी ओळख करून दिली



## अखेर तुझ्यात जीव रंगलाच! हार्दिक अक्षया अडकले लग्नाच्या बेडीत..

'तुझ्यात जीव रंगला'फेम राणादा आणि पाठक बाई म्हणजेच मराठीतील प्रसिद्ध कलाकार हार्दिक जोशी आणि अक्षया देवधर कधी एकदा लग्नगाठ बांधणार यांची उत्सुकता सर्वांना लागली होती. अखेर तो दिवस उगवला आहे. आज 2 डिसेंबर रोजी हार्दिक आणि अक्षया विवाह बंधनात अकडले आहेत.

हार्दिक आणि अक्षया ही दोन्ही कलाकार आपल्या भेटीला आले ते झी मराठीवरील 'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेतून. कोल्हापूरच्या मातीत रंगलेल्या या मालिकेने प्रेक्षकांची मनं जिंकलीच. शिवाय मालिकेतील प्रमुख कलाकार हार्दिक आणि अक्षया यांच्यावरही भरभरून प्रेम केलं. हार्दिक या मालिकेत राणादादा तर अक्षया अंजली पाठक बाईंच्या भूमिकेत होत्या. त्यांची ही जोडी हिट ठरली. आजही या दोघांना कुणी हार्दिक आणि अक्षया म्हणून फारसं ओळखत नाहीत तर 'राणादा आणि पाठक बाई' म्हणूनच त्यांची ख्याती आहे. असे प्रेक्षकांचे लाडके राणादा आणि पाठक बाई आज खऱ्या आयुष्यातही एकमेकांचे जीवनसाथी झाले.

हार्दिक अक्षया यांनी बरीच वर्षे एकत्र काम केले आहे, त्यांच्यात घट्ट मैत्री आहे. पुढे मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला, गेल्या वर्षी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर 3 मे 2022 रोजी त्यांनी अत्यंत दिमाखात आपला साखरपुडा उरकला. त्यानंतर सर्वांना उत्सुकता होती ते त्यांच्या लग्नाची. अखेर साखरपुड्यानंतर पाच महिन्यांनी ते लग्न बंधनात अडकले. मध्यंतरी त्यांचे केळवण झाल्याचेही फोटोही व्हायरल झाले होते. त्यानंतर दोघांच्या कुटुंबाने मिळून नाशिक येवला येथे साड्यांची खरेदी केली. यावेळी अक्षयाची साडी विणतानाचे फोटोही व्हायरल झाले होते. तसेच त्यांची लग्नपत्रिका आणि त्यावर चांदीचे पान याचीही चर्चा झाली होती. पण ही तारीख कोणती असेल याबाबत मात्र गुप्तता पाळली होती. आज मात्र लग्नाच्या व्हिडिओ व्हायरल झाल्याने त्यावर शिक्कामोर्तब झाली.

हार्दिक-अक्षयाचे हळदी, संगीत सोहळ्याचे फोटो गेली दोन दिवस चर्चेत आहेत. आज 2 डिसेंबर रोजी पुण्यामध्ये त्यांचे लग्न पार पडले असून अत्यंत पारंपरिक असा हा विवाह सोहळा आहे. लग्नानंतर दिमाखदार रीसेप्शन पण असणार आहे. या सोहळ्याला मनोरंजन विश्वातील काही मोजकीच मंडळी उपस्थित राहणार आहेत.

## अनेक वर्ष मोठ्या पडद्यापासून का दूर होत्या वर्षा उसगांवकर?

अनेक वर्ष आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक म्हणजे वर्षा उसगांवकर. उत्तमोत्तम चित्रपट, नाटकं आणि मालिकांमध्ये काम करत अनेक वर्ष त्यांनी प्रेक्षकांना भुरळ घातली. परंतु गेली काही वर्ष त्या मोठ्या पडद्यावर झळकल्या नाहीत. मधल्या काळात त्या छोट्या पडद्यावर सक्रिय होत्या. परंतु त्या वर्षात त्या चित्रपटात का काम करत नाहीत, असा प्रश्न प्रेक्षकांना पडला होता. अखेर त्यांनी स्वतः याचं कारण उघड केलं आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'हवाहवाई' चित्रपटाच्या निमित्ताने त्यांनी आणि चित्रपटाच्या संपूर्ण टीमने 'लोकसत्ता डिजीटल अड्डा'वर हजेरी लावली आणि मनमोकळ्या गप्पा मारल्या. त्यावेळी बोलताना वर्षा उसगांवकर यांनी चित्रपटसृष्टीपासून दूर राहण्याचं कारण सांगितलं. त्या म्हणाल्या, "चित्रपटात काम करण्याची माझी खूप इच्छा होती, पण कणा असलेल्या भूमिकाच मला विचारण्यात आल्या नाहीत. एक दिवसाची, दोन दिवसाची, दहा दिवसाची भूमिका मला ऑफर होत होत्या." पुढे त्यांनी त्यांना गेल्या काही वर्षात आलेले निर्माता – दिग्दर्शकांचे अनुभवही सांगितले. त्या म्हणाल्या, "एक निर्माता माझ्याकडे एका चित्रपटाची कथा ऐकवायला आला. त्याने कथा ऐकवायला सुरुवात केली. तो म्हणाला, "तुम्ही हिरोच्या आई असता...तुम्ही अमेरिकेहून येता" आणि पुढे तो कथा विसरला. मला आश्चर्य वाटलं. मी अमेरिकेहून भारतात येऊन काय करते, हेच जर दिग्दर्शक विसरत तर मी अशी भूमिका का करायची? काम करण्याच्या समाधानाबरोबरच पैसे मिळवणंही महत्वाचं असलं तरी पैशासाठी मी चित्रपटांच्या कथेच्या बाबतीत तडजोड करणार नाही." दरम्यानच्या काळात त्यांनी जे मराठी चित्रपट केले ते प्रेक्षकांपर्यंत पोहोचले नाहीत.



## पन्नाशी गाठली पण तिचं सौंदर्य कमी होईना!



आप जैसा कोई मेरे जिंदमी मैं आये तो बात बन जाये.... नावाचे गाणे मलायकाच्या भूमिकेत व्हायरल झाले. तिनं या गाण्यामध्ये केलेला डान्स प्रेक्षकांना कमालीचा आवडला आहे. त्यावरुन नेटकऱ्यांनी तिचं कौतूकही केलं आहे. मलायका ही सोशल मीडीयावर तिच्या बोल्डनेससाठी ओळखली जाणारी अभिनेत्री आहे.

सध्या मलायका चर्चेतला चेहरा आहे, वेगवेगळ्या पार्ट्यांमध्ये मलायका ही व्हायरल होताना दिसते. त्यावर तिला नेटकऱ्यांनी दिलेल्या प्रतिक्रियाही चर्चेचा विषय आहेत. मलायकाचा फॅशन सेन्स हा अजब आहे. त्यामुळेच ती लाईमलाईटमध्ये असते. तिच्या इंस्टावरुन व्हायरल झालेल्या फोटोंना त्यांची पसंती मिळताना दिसते. कोरोनाच्या काळात मलायकानं चाहत्यांना फिटनेसचे महत्व सांगत योगासनाचे धडे दिले होते. आजच्या घडीला बॉलीवूडमधील सर्वात बोल्ड सेलिब्रेटी म्हणून मलायकाचे नाव घेता येईल. मलायका आता पन्नाशीच्या जवळ आली आहे. अशावेळी तिचं ग्लॅमर, तिचं चर्चेत राहणं हे सारं प्रभावित करणारं आहे. फिटनेस फ्रीक म्हणून मलायकाचा बोलबाला आहे. सध्या तिचा एक व्हिडिओ व्हायरल होतो आहे. त्यामध्ये ती एका पार्टीमध्ये सहभागी झाली आहे. आणि त्यात उपस्थित फोटोग्राफर्सची तिची छबी टिपण्यासाठी चाललेली लगबग दिसून येते आहे. यावेळी मलायकानं देखील पोझ देत फोटोग्राफर्सला खुश केले आहे. तिचे ते फोटो पाहून नेटकऱ्यांनी त्यावर दिलेल्या प्रतिक्रिया खास आहेत.

मलायकाचा तो कॅटलूक चाहत्यांना कमालीचा

## आमिर खानच्या 'या' सुपरहिट चित्रपटाचा येणार सिक्वेल

गेल्या काही वर्षात अनेक गाजलेल्या चित्रपटांचे सिक्वेल बॉलिवूडमध्ये तयार करण्यात आले. यात 'गोलमाल', 'सिंघन', 'धूम' अशा सुपरहिट चित्रपटांचा समावेश आहे. अशातच आता आणखी एका लोकप्रिय चित्रपटाचा दुसरा भाग येणार आहे. हा चित्रपट म्हणजे आमिर खानचा 'गजनी.' मूळ तमिळमध्ये बनलेल्या 'गजनी' या चित्रपटात सुरिया, असिन आणि नयनतारा मुख्य भूमिकेत होते. तीन वर्षांनंतर, म्हणजेच २००८ मध्ये या चित्रपटाचे दिग्दर्शक मुर्गदास यांनी या चित्रपटाचा हिंदी रिमेक केला. या हिंदी रिमेकमध्ये आमिर खान आणि असिनसह जिया खान हे कलाकार प्रमुख भूमिकेत होते. शॉर्ट टर्म मेमरी लॉस या आजारावर बेतलेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनावर लॉन्ग टर्म गारुड केलं होतं. खुद्द आमिर याच्या प्रमोशनसाठी रस्त्यावर उतरून लोकांना खास गजनी



# अर्जेंटिनाची पोलंडवर मात; दोन्ही संघ बाद फेरीत!

## पोलंडच्या संघाला तब्बल 36 वर्षांच्या प्रतिक्षेनंतर विश्वचषक

**दोहा ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



लिओनेल मेसीच्या नेतृत्वाखालील अर्जेंटिनाने अत्यंत प्रभावाशाली खेळ करत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या अखेरच्या गट साखळी सामन्यात पोलंडवर २-० अशी मात केली. या विजयामुळे अर्जेंटिनाने क-गटातून अव्वल स्थानासह बाद फेरी गाठली, तर पोलंडला पराभवानंतरही मेक्सिकोपेक्षा सरस गोलफरकामुळे बाद फेरीत आगेकूच करण्यात यश आले.

या सामन्यापूर्वी दोन्ही संघांचे बाद फेरीतील स्थान निश्चित नव्हते. त्यामुळे या सामन्यात त्यांनी सर्वोत्तम खेळ करणे गरजेचे होते. अर्जेंटिनाची भिस्त मेसी, तर पोलंडची भिस्त रॉबर्ट लेवांडोवस्की या तारांकित आघाडीपटूंवर होती. या दोघांनाही या सामन्यात गोल मारता आला नाही. मेसीने पूर्वार्धात पेनल्टीची संधीही वाया घालवली. त्यानंतरही अर्जेंटिनाने सामन्यावर पूर्ण वर्चस्व राखले. अर्जेंटिनाकडून ४६व्या मिनिटाला मध्यरक्षक ॲलेक्सिस मॅक ॲलिस्टर, तर ६७व्या मिनिटाला ज्युलियन अल्वारेझ यांनी गोल केले. या दोघांचेही विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील हे पहिलेच गोल ठरले.

क-गटातील हा सामना विलक्षण ठरला. अर्जेंटिनाने सामन्याच्या पहिल्या मिनिटापासून आक्रमक आणि सफाईदार खेळ केलाच, शिवाय त्यांच्या खेळात कमालीचा वेग होता. त्यांनी चेंडूवर नियंत्रण ठेवले. संपूर्ण सामन्यात अभावानेच अर्जेंटिनाच्या कक्षात खेळ झाला. पोलंडला गोल करण्यापेक्षा, अर्जेंटिनाला गोल न देण्यावर लक्ष केंद्रित करावे लागले. अर्जेंटिनाच्या संघाने या सामन्यात तब्बल २३ फटके गोलच्या दिशेने मारले.

अर्जेंटिनाच्या ॲन्जेल डी मारिया, मेसी, अकुन्या, अल्वारेझ यांनी केलेल्या आक्रमणांमुळे पोलंडचे पूर्ण नियोजन गडबडून गेले. मेसीला पेनल्टीवर गोल करण्यात अपयश आले. अशा पार्श्वभूमीवर पहिल्या सत्राचा खेळ संपला. दुसऱ्या सत्राच्या पहिल्याच मिनिटाला नाहुएल मोलिनाच्या पासवर मॅक ॲलिस्टरने गोल करत अर्जेंटिनाला आघाडीवर नेले. त्यानंतर एंझो फर्नांडिझने पोलंडचा बचाव भेदला आणि अल्वारेझकडे पास दिला. अल्वारेझनेही चपळाने फटका मारताना चेंडूला गोलजाळीची दिशा दिली. यानंतर पोलंडला पुनरागमन करता आले नाही.

### अखेरच्या क्षणापर्यंत उत्सुकता

क-गटातून अर्जेंटिनासह कोणता संघ बाद फेरीत प्रवेश करणार याची अखेरच्या क्षणापर्यंत उत्सुकता होती. अर्जेंटिनाविरुद्धच्या सामन्यात पराभूत झाल्यामुळे पोलंडचा संघ स्पर्धेबाहेर होण्याची शक्यता निर्माण झाली होती. एकाच वेळी सुरू असलेल्या या गटातील अन्य सामन्यात मेक्सिकोचा संघ सौदी अरेबियाविरुद्ध २-० आघाडीवर असेपर्यंत पोलंडचा बाद फेरीतील प्रवेश संकटात होता. मात्र, भरपाई वेळेत सौदी अरेबियाने गोल करून मेक्सिकोचे खेळाडू आणि चाहत्यांना निराश केले.

# आयपीएलचे बिगुल वाजले;

## या' दिवशी होणार 991 पैकी 87 खेळाडूंचा लिलाव

**नवी दिल्ली, ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



इंडियन प्रीमियर लीग (IPL 2023) च्या सोळाव्या हंगामासाठी खेळाडूंचा लिलाव २३ डिसेंबर रोजी कोची येथे होणार आहे. या मिनी लिलावासाठी ९९१ खेळाडूंनी आपली नावे दिली आहेत. त्यापैकी सर्वाधिक ७१४ क्रिकेटपटू भारतातील आहेत. भारताशिवाय इतर १४ देशांतील खेळाडूंनीही नोंदणी केली आहे. आता फ्रँचायझी या यादीतून लिलावासाठी खेळाडूंची निवड करतील.

परदेशी खेळाडूंमध्ये ऑस्ट्रेलियाचे सर्वाधिक ५७ खेळाडू आहेत. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेतील ५२ खेळाडूंनी आपली नावे दिली आहेत. यावेळी मिनी लिलावात फारसे खेळाडू खरेदी केले जाणार नाहीत. कारण फक्त ८७ खेळाडूंसाठी जागा शिल्लक आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकामध्ये, सचिव जय शाह म्हणाले, "जर प्रत्येक फ्रँचायझीने त्यांच्या संघात जास्तीत जास्त २५ खेळाडूंचा समावेश केला, तर या लिलावात एकूण ८७ खेळाडूंना बोली लागेल." ज्यामध्ये ३० परदेशी खेळाडू असू शकतात. खेळाडूंच्या यादीमध्ये १८५ कॅप्ड (राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व केलेले), ७८६ अनकॅप्ड आणि २० सहयोगी देशांतील खेळाडूंचा समावेश आहे. या यादीत ६०४ अनकॅप्ड भारतीय खेळाडू आहेत. त्यापैकी ९१ खेळाडू यापूर्वी आयपीएलचा भाग राहिलेले आहेत.या मिनी लिलावात २७७ परदेशी खेळाडू सहभागी होणार आहेत. या सर्व खेळाडूंच्या यादीत ऑस्ट्रेलियाच्या सर्वाधिक ५७ क्रिकेटपटूंचा समावेश असेल. यानंतर दक्षिण आफ्रिकेचे ५२ खेळाडू असतील. तर वेस्ट इंडिजचे ३३, इंग्लंडचे ३१, न्यूझीलंडचे २७, श्रीलंकेचे २३, अफगाणिस्तानचे १४, आयर्लंडचे ८, नेदरलँडचे ७, बांगलादेशचे ६, यूएईचे ६, झिम्बाब्वेचे ६, नामिबियाचे ५ आणि स्कॉटलंडचे २ खेळाडू आहेत.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही